Vol-02

ISSN 2394-5303

International Multilingual Research Journal

# Printing Area™

Special Issue January 2018

UGC Approved Refereed Journal Jr. No. 43053

Pankaj Shaikshanik and Samajik Sanstha's


**Pankaj Kala Mahavidyalaya, Chopda**

'B' Grade NAAC Accredited

Organizing

Two Days Interdisciplinary International Conference on

## EMERGING TRENDS IN HIGHER EDUCATION



Editor
Dr.Sambhaji Desai
Principal

Sponsored by
North Maharashtra University, Jalgaon

14) Value education for personal, social and environmental wellbeing.
Alok Gude, Mumbai ||60

15) Education 2030 Incheon DeclarationTowards inclusive and equitable...
Dr. Jagdish G. Kharat ||61

16) Role of Higher Education for Skill development in India
Prof. Mangesh K. Shirsath & Prof. Abhay B.Shinde, Dist. –Beed ||62

17) IMPORTANCE OF HIGHER EDUCATION IN INDIAN DEFENCE
Prof. Sanjay Santosh Patil, Chopda ||65

18) ROLE OF WOMEN EMPOWERMENT THROUGH HIGHER EDUCATION
Prof. Sunil Dada Surwade, Chopda ||72

19) IMPACT OF HIGHER EDUCATION ON TRIBLE DEVLOPMENTS
Prof. Shamsing Valavi, Chopda ||73

20) ROLE OF PHYSICAL EDUCATION IN INDIAN EDUCATION SYSTEM
Prof. Dr. Vijay K. Patil, Chopda ||75

21) मराठी कादंबरीतून शेतीच्या समस्येचे वर्णन
प्रा. डॉ. हरिदास देविदास आकोटकार, जि. बुलढाणा ||82

22) भारतातील उच्च शिक्षण : एक दृष्टीक्षेप
प्रा.डॉ.डी.के.कदम, जि.नांदेड. ||85

23) महिला सक्षमीकरण आणि उच्च शिक्षण
प्रा.डॉ.नंदा पी.कंधारे, जि.जळगांव. ||88

24) उच्च शिक्षणातील प्रशासनाची भूमिका
प्रा. डॉ. प्रकाश नामदेव पाटील, जिल्हा जळगांव ||90

25) महिला सबलीकरण वास्तव व व्यथा
Asso.प्रो. माया तानाजी शिंदे , जळगांव ||94

26) उच्च शिक्षणातून महिला सबलीकरण
प्रा. डॉ. शकुंतला एम. भारंबे, जि. जळगांव ||96

https://sites.google.com/site/vidyawartajournal http://www.vidyawarta.blogspot.com

26

# भारतातील उच्च शिक्षण : एक दृष्टीक्षेप

**प्रा.डॉ.डी.के.कदम**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर जि.नांदेड.

मानवी जीवनात शिक्षणाला अनन्य साधारण महत्त्व असून, जीवनाचा असलेले शिक्षण हे शाळा, महाविद्यालय यासारख्या औपचारिक शिक्षण संस्थाच्या माध्यमातून दिले जाते. कोणताही विकास मनुष्य हा जन्मतः सुशिक्षित नसतो. परंतू प्रयत्नपुर्वक त्यांच्यावर शिक्षणाव्दारे मुल्य संस्कार करुन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास साधता येतो. ज्ञानामुळे आत्मभान निर्माण करता येते हे सर्व शिक्षणाशिवाय अशक्य आहे. शिक्षणामुळे प्रचंड ध्येयवाद, निर्भिडता, सुसंस्कृतपणा, कृतिप्रवणता, स्वावलंबन आणि खऱ्या अर्थानी स्वहिताचा व राष्ट्रहिताचा सातत्याने विचार करणारी व्यक्ती तयार होते. खऱ्या अर्थाने सभ्य सुसंस्कृत मनुष्य घडविणे, या सोबतच नैतिकतेची जोपासना कशी करावी हे शिकविणे म्हणजे शिक्षण होय. व्यक्तिमत्त्वाचा विकास घडविण्याचे कार्य शिक्षणाव्दारे होत असते. व्यक्तिमत्त्वाचा विकास होणे म्हणजेच पर्यायाने जबाबदार नागरिक निर्माण करणे, चांगली माणसे घडविणे व सामाजिक बांधिलकी पत्कारुन समाजसेवा करणे हे महत्त्वाचे कार्य शिक्षणातून होत असते. जागतिकीकरणात, स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी व भौतिक जीवन सुखी समृध्द व समाधानी होण्यासाठी उच्च शिक्षण अत्यंत आवश्यक आहे.

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मुलभूत गरजांची पूर्ती करणारे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहण्याची पद्धत दिवसेंदिवस वाढत आहे. आजपर्यंत जे ज्ञान प्रसंगोत्पात सहजासहजी दिले जाई ते सहतेकपणे व तंत्रशुद्ध पद्धतीने देण्यास सुरुवात करण्याची आवश्यकता भासली आहे. शिक्षणाची प्रक्रिय गतिमान व्हावी, शिक्षणाचे सर्वांगीकरण व्हावे या उद्देशाने स्वातंत्र्य शिक्षणाच्या संदर्भात अनेक आयोग व समित्या स्थापन केल्या. त्यात राधाकृष्णन आयोग १९३४, मुदलीयार आयोग १९५२, कोठारी आयोग १९६४, राष्ट्रीय धोरण १९६८, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६, Implementation of New Education Policy १९९२, बिर्ला-अंबानी समिती २००२, यशपाल समिती २००५, Knowledge Commission २००६, UGC Required Commisttee २००६, RTE २००४. भारत देश उच्च शिक्षणातील तिसऱ्या क्रमांकाचा आहे. भारतातील उच्च शिक्षणाची स्थिती सुधारावी गुणवत्ता उच्च शिक्षण मिळावे. या National Policy in Education - १९८६, UGC ने National Assessment and Accreditation Council १९९४ इत्यादी शासनाचे शिक्षण विषयक धोरणाने उच्च शिक्षणाची स्थिती सुधारण्यास मदत झाली.

**अध्ययनाचा उद्देश :-**

१) भारतातील उच्च शिक्षणाच्या स्थितीचा आढावा घेणे.
२) भारतातील उच्च शिक्षणातील समस्याचा अभ्यास करणे.
३) भारतातील उच्च शिक्षणावर उपाय योजना सुचविणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोध निबंधाच्या अध्ययनासाठी तथ्या संकलन मिळवितांना व्दितीय संकलना पद्धतीचा अवलंब केला आहे. ज्यामध्ये संशोधन विषयाशी संबंधित पुस्तके, ग्रंथ व निमशासकीय, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे, मासिके, शोध प्रबंध, कार्यशाळा, सेमिनार, चर्चासत्र तसेच इंटरनेटवरील माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

**तथ्य संकलन :-**

भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीत बौध्द धर्माला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. इ.स.पू.सहावे शतक हे प्राचीन भारताच्या इतिहासातील एक क्रांतीकारक शतक मानल्या जाते. या काळात भारतातील उच्च शिक्षणाची स्थिती चांगली असल्याचे स्पष्ट होते. कारण प्राचीन भारतात नालंदा तक्षशीला हे उच्च शिक्षणाचे केंद्र होते. इ.स.पूर्व ३ ऱ्या शतकापासून ते इ.सत्र ४ थ्या शतकापर्यंत हे विद्यापीठे अस्तित्वात होती असे पुराव्यावरुन स्पष्ट होते. तक्षशीला विद्यापीठात शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या भोजन आणि निवासाची व्यवस्था होती. काही कथांच्या आधारे ५०० विद्यार्थी शिक्षण घेत होते. नालंदा विद्यापीठात १२००० विद्यार्थी ओदान्तपुरी अथवा कानपुर विद्यापीठात २०००, वल्लभी विद्यापीठात ७०० तर विक्रमशीला विद्यापीठात ३००० विद्यार्थी शिक्षण घेत होते. याशिवाय शारदा विद्यापीठ, काशी विद्यापीठ, रांची विद्यापीठ, महुदरा वंगी, नागार्जून उच्च विधी आयोध्या, बौध्दगया, मोह, उज्जैन इत्यादी उच्च शिक्षणाची विद्यापीठे होते.

भारतात ब्रिटिशांचे आगमन झाले तेंव्हा भारतात शिक्षणाची स्थिती ही अतिशय विदारक स्वरुपाची होती. शुद्रानिशुद्रांना स्त्रियांना शिक्षणाची व्दारे बंद होती. तत्कालीन समाजातील शैक्षणिक स्थिती जे वर्णन महात्मा फुले यांनी केले होते. ब्रिटिश सरकारने भारतातील शिक्षण विषयक स्थितीचा आढावा, समस्या व त्यावरील उपाय योजना यांचा अभ्यास करण्यासाठी हंटर आयोगाची स्थापना केली. त्या हंटर

आयोगाने दिलेल्या निवेदनात भारतातील शैक्षणिक स्थितीचे वर्णन केले. उच्च शिक्षण घेतलेले हे दुर्बीण मधून पाहण्यासारखे आहेत असे म्हटले.

ब्रिटिशांच्या उदारमतवादी धोरणामुळे भारतात शिक्षणाला चालना मिळाली. भारतात ब्रिटिश राजवटीत उच्च शिक्षणासाठी इ.स.१८५८ मध्ये ३ विद्यापीठ, २७ महाविद्यालयात त्यात ५३९७ विद्यार्थी शिक्षण घेत होते. ब्रिटिशांच्या काळात उच्च शिक्षणाचा जास्त प्रमाणात विकास झाला नाही. कारण इ.स. १९४७ पर्यंत भारतात उच्च शिक्षणासाठी १९ विद्यापीठ, ४९६ महाविद्यालये तर २४१३६९ विद्यार्थी उच्च शिक्षण घेत होते. ब्रिटिश काळातील उच्च शिक्षणाचा विचार केला तर भारतात जवळपास १०० वर्षात १६ विद्यापीठ संख्या वाढली तर ४८९ महाविद्यालयाची संख्या वाढ झाली. उच्च शिक्षण घेणाज्या विद्यार्थ्यांची संख्या २३५९७० वाढ झाली. ब्रिटिशांच्या उदारमतवादी धोरणामुळे उच्च शिक्षणाची प्रगती अशा प्रकारे झाल्याचे दिसून येते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात जो उच्च शिक्षणाचा विस्तार झाला. इ.स. २०१०-११ मध्ये भारतात ५६४ विद्यापीठे शिक्षकांची संख्या ८,१६,९६६ असून महाविद्यालयाची संख्या ३३०२३ एवढी आहे. उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांची संख्या १,६९,७५,००० झाली आहे. ऑल इंडिया सर्वे ऑफ हायर एज्युकेशनच्या (एआयएसएचई) आकडेवारीनुसार देशात २०१५-१६ मध्ये भारतात ७९९ विद्यापीठे होते. सध्या ८६४ विद्यापीठे आहेत. उच्च शिक्षण घेणाज्या विद्यार्थ्यांची संख्या ३.५७ कोटी होती. त्यात १.९ कोटी मुले तर १.६७ कोटी मुलींचा समावेश होता. त्यातील २.८३ कोटी विद्यापीठे पदवी स्तराचे शिक्षण घेत होते. यातील ४० लाख किंवा ११.२ टक्के विद्यार्थी पदव्युत्तराचे शिक्षण घेत होते. यामध्ये पीएच. डी. शिक्षण घेणाज्या विद्यार्थी संख्या ०.४ टक्के होती.

भारतात उच्च शिक्षण घेणाज्या विदेशी २०१५-१६ मध्ये ४५,४२४ विद्यार्थी तर २०१६-१७ विदेशी विद्यार्थी हे ४५,५७५ होते. आज भारताला स्वातंत्र्य प्राप्ती होऊन ६५ वर्षानंतरही एकुण लोकसंख्याच्या ७ टक्के लोक हे उच्च शिक्षण घेतांना दिसून येतात.

कॅनडा हे उच्च शिक्षणात प्रथम क्रमांकावर आहे. कॅनडा ८८%, संयुक्त अमेरिका ८०%, जपान ५८%, स्विडीण ५०%, फ्रान्स ५१% भारतात उच्च शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे. भारतात उच्च शिक्षणाचा विकास होत असतांना अनेक बाबीचा अभाव असल्याचे दिसून येते. संशोधक विद्यार्थ्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. पीएच.डी. करणारे संशोधक विद्यार्थी ०.४% आहेत. जगभरातील विद्यापीठ भारतातील विद्यापीठापेक्षा खुपच सुधारीत आहेत. जगभरातील पहिल्या २०० विद्यापीठामध्ये भारतातील एकही विद्यापीठ नाही. भारतातील विद्यापीठांचा दर्जा सुधारावयाचा असेल तर भारतातील प्रत्येक विद्यापीठामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन झाले पाहिजे. भारतातील विद्यापीठात Irrelevent Outdated syllabus, Lack of good quality traing of human resources, Lack of sufficient allocation of money of higher education system, सुशिक्षित बेरोजगारांची मोठी संख्या, संस्था, महाविद्यालय चालविण्यात खाजगी संस्थाचालकांचा हस्तक्षेप तसेच योग्य यंत्रणांचा अभाव, शिक्षण संस्थामध्ये भौतिक सुविधांचा अभाव इत्यादी.

उच्च शिक्षणातील अडचणी दूर करण्यासाठी आजची भारतीय शिक्षण पद्धती ही खुपच जुनी झालेली आहे. त्यात उच्च शिक्षण घेऊन सुशिक्षित बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आजचे शिक्षण हे केवळ पदव्या धारण करण्याचे सशक्त माध्यम बनत चालले आहे. या ध्येयधोरणामध्ये रचनात्मक बदल घडवून आणून सर्वांना गुणवत्तापुर्ण शिक्षण उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. आज डि.एड., बी.एड., बी.ए. आणि बी.कॉम. यासारख्या अनेक वर्षापासून चालत आलेले शिक्षण घेत बसण्यापेक्षा स्वतःच्या पायावर उभे राहून स्वावलंबी बनविण्यासाठी व्यवसायभिमुख शिक्षण व्यवस्थेचा अंगीकार करावा. शिक्षण असे असावे की त्यामुळे उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडवता येईल. घ्जे शिक्षण भाकरी देऊ शकत नाही ते शिक्षण काय कामाचेङ म्हणुन बदलत्या काळाशी अनुसंधान राखणे महत्त्वाचे आहे. शिक्षणातून व्यक्तिमत्वाचा विकास व्हावाच परंतू अर्थाजनाचे साधन उपलब्ध होणे तितकेच महत्त्वाचे आहे. शिक्षण व्यवस्थेतून शिक्षण घेवून बाहेर पडणाज्या पदवी पदवीधारकाकडे ज्ञान, कौशल्य आणि उद्योग व्यवस्थेमध्ये असलेली आणि पुढच्या काळात निर्माण होणारी मनुष्यबळाची मागणी यांचा मेळ घालणे महत्त्वाचे आहे. म्हणून उच्च शिक्षण हे व्यवसायभिमुख असावे.

आज भारतीय उच्च शिक्षण पद्धती जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कालबाहय ठरत आहे. अस्तित्वात असलेल्या प्रचलित महाविद्यालयाच्या जोडीला कांही व्यावसायिक शिक्षण देणारी महाविद्यालयेही स्थापन होत आहे. व्यवसायभिमुख शिक्षण व्यवस्थेत आय.टी., आय.आय.टी., इंजिनिअरींग, कृषी पदवी, कृषी पदविका, बी.एस्सी., बी.सी.ए., एम.सी.ए. यासारखे विविध पदव्या पदव्युत्तर शिक्षणाचा यात समावेश होतो. या व्यवसायात्मक फक्त आय.टी.क्षेत्राचाच अंगीकार करणाराच व्यवसायभिमुख शिक्षण म्हणून समावेश होत आहे तर यामध्ये टेलरिंग, चित्रकला, बांधकाम, फॅशन डीझाईनींग, हॉटेल व्यवस्थापन, सुपरवायझर यासारख्या शिक्षणाचा

समावेश करावा. यासारख्या व्यावसायिक शिक्षणाने नोकरी मागणारा तरुण तयार होणार नसून नोकरी देणारा तरुण निर्माण होवू शकतो. यासाठी व्यावसायिक शिक्षण देणारी डी.एड., अभियांत्रिकी, वैद्यकिय, बी.फार्म, पशु वैद्यकिय, कायदा इत्यादी महाविद्यालय खाजगी संस्थाचालकांच्या नियंत्रणात असून या शिक्षणासाठी प्रति विद्यार्थी किती फी आकाराची याचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीने संस्थाचालकांना दिलेले आहे त्यामुळे गुणवत्ता, विद्वत्ता, चिकाटी व जिद्द असतांना देखील फक्त खाजगी महाविद्यालयाची अवाढव्य फी भरण्याची आर्थिक कुवत नसल्यामुळे गरीब विद्यार्थ्यांना या महाविद्यालयातून प्रवेश मिळत नाही. इ.स. २००३ या वर्षात भारतातील एकूण २० राज्यातील वैद्यकिय महाविद्यालयापैकी जवळपास ३४.०८% तर ६५% अभियांत्रिकी महाविद्यालये खाजगी संस्थाचालकांच्या नियंत्रणात आहेत ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्रातील प्राध्यापक भरतीमध्ये चालणारे डोनेशन हे अतिशय भयावह आहे. कांही बोटावर मोजण्याइतक्या संस्था वगळल्या तर इतर संस्था महाविद्यालयात प्राध्यापक होण्यासाठी नेट, सेट, पीएच.डी. असणाऱ्या विद्यार्थ्यांना २० ते ३० लाख रुपये डोनेशन दयावे लागते. त्यामुळे गरीब सर्वसामान्य तरुण उच्च शिक्षण घेवून प्राध्यापक पदी नियुक्त होऊ शकेल का हा यक्ष प्रश्न आहे. आज उच्च शिक्षणासाठी भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. भारतामध्ये जर अमेरिकेने उच्च शिक्षण क्षेत्रात प्रत्यक्ष गुंतवणूक केली तर फी भरण्याच्या आराखडयाच्या काठावर असणाऱ्या अनेक भारतीय विद्यार्थ्यांना अमेरिकन उच्च शिक्षणाचा लाभ मिळाला असता.

भारतात उच्च शिक्षणाची प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी शिक्षणाची उपलब्धता जास्त असायला हवी. शिक्षणाची उपलब्धता जास्त झाल्यामुळे बहुसंख्य लोकांपर्यंत शिक्षण पोहचू शकते परिणामी भारतातील उच्च शिक्षणाचे प्रमाण जे ७ टक्क्यांवर आहे ते वाढविता येते. गुणवत्ता उच्च प्रकारची असायला हवी. त्यामुळे सर्व विद्यार्थी आणि समाज यांच्या इच्छा गरजांची व आकांक्षेची कमीतकमी खर्चात पुर्तता होईल. उच्च शिक्षण गुणवत्ता पुर्ण असणारे असेल तर व्यक्तीला काहीनाकाही काम मिळवून देवू शकते. गुणवत्तापुर्ण शिक्षणातून व्यक्तीची ज्ञान व क्षमता वाढते. त्यामुळे त्यांना रोजगाराच्या संधी अपोआप उपलब्ध होवू शकतात. उच्च शिक्षणातील संस्था, महाविद्यालये चालविण्यात खाजगी संस्थाचालकांचा हस्तक्षेप आहे तो कमी होणे गरजेचे आहे. खाजगी महाविद्यालयातील फिस (किंमत) सर्वसामान्य गरीब विद्यार्थ्यांना परवडत नाही. शिक्षणाची किंमत जास्त असल्यामुळे सर्वांना शिक्षण मिळत नाही. त्यामुळे ठराविक उच्च आर्थिक वर्गातील विद्यार्थीच शिक्षण घेवू शकतात. म्हणून सद्यस्थितीत उच्च शिक्षण हे सर्वसामान्यांसाठी महागडे होत चालले आहे. त्यासाठी शासनाने शिक्षणाची उपलब्धता वाढविणे (Access), शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे (Quality) व शिक्षणाची किंमत कमी करणे (Cost) हे महत्त्वाचे आहे.

**संदर्भसूची :-**

१) Moment of Buddha Dhamma In India, Avon Publication Delhi-११००९२.

२) ज्ञानतिर्थ ०१ जानेवारी २०१३ ते ३१ मार्च २०१३ त्रैमासिक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ विष्णुपरी, नांदेड - ४३१६०६

३) दैनिक लोकमत ०८ जानेवारी २०१८.

४) योजना मासिक जुलै - २०११.

५) ग.व्हि.अकोलकर व ग.श.डोंगरे शिक्षणाचा अर्थ व प्रयोजन, विद्या प्रकाशन शनिवार पेठ, पुणे.

६) अखिल भारतीय विद्यापीठ हस्तपुस्तिका २००० नवी दिल्ली.

७) संवाद पत्रिका मुक्त विद्यापीठ नाशिक डिसेंबर - २०१२, जानेवारी - २०१३.

❑❑❑